I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** वर्धा **P.S. (पोलीस ठाणे):** सेलू **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0080 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/01/2025 23:08 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 20/01/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 20/01/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ५ **Time From (वेळेपासून):** 12:17 तास **Time To (वेळेपर्यंत):** 13:26 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 20/01/2025 **Time (वेळ):** 22:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 036 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 20/01/2025 23:08 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** उप अधिक्षक , भुमि अभिलेख कार्यालय , सेलू,सेलू-442001

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6.

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** देवेंद्र गंगाधर महाकाळकर

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1965

(d) **Nationality (राष्‍ट्रीयत्‍व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जयस्वाल कॉँलनी, वार्ड नं 6, मेन रोड बुट्टीबोरी,, नागपुर, बोरी, नागपुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | जयस्वाल कॉँलनी, वार्ड नं 6, मेन रोड बुट्टीबोरी,, नागपुर, बोरी, नागपुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9960021715

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नरेश चंद्रकांत जाधव | | | 1. प्लॉट क्र 41,Town/Village (शहर / गाव): ड्रीम लॅन्ड,सिटी सावंगी मेघे,Tehsil (तहसील): वर्धा,Police Station (पोलीस ठाणे): सवंगी मेघे पोलिस स्टेशन,District (जिल्हा): वर्धा,State (राज्य): महाराष्ट्र-442001,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

तक्रार देताच

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनाच्या 500 रू दराच्या 10 चलनी नोटा | 5,000.00 |
| 2 | इतर | घरगुती वस्‍ तु | भुमि अभीलेख कार्यालय सेलू यांनी उप विभआगीय अधिकारी वर्धा यांना पाठविण्याचा अहवाल | .00 |
| 3 | इतर | घरगुती वस्‍ तु | एक खाकी रंगाचे बुक | .00 |
| 4 | इतर | यंत्र–उपकरण/उपसाधन | दोन सॅनडिक्स कंम्पनीचे 32 जी. बी. क्षमतेचे मेमरी कार्ड | .00 |

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 5,000.00

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद
कॅम्प सेलु , जिल्हा वर्धा.
दिनांक 20/01/2025

मी श्री. देवेंद्र गंगाधर महाकाळकर, वय 60 वर्शे, व्यवसाय- शेती/दवाखाना (डॉक्टर)रा. जयस्वाल कॉलनी, वार्ड नं. 6, मेन रोड बुट्टीबोरी,त.जि.नागपुर, मो.क्र. 9960021715 दिनांक 20/01/2025 रोजी सकाळी 09.30 वाजता श्रीमती वैशाली वैरागडे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वर्धा यांचे कार्यालयात समक्ष हजर येवून एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधाने तक्रार असल्याबाबत माहिती दिली. श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम यांनी माझे तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्यासाठी दोन शासकीय पंचांना कार्यालयात बोलावीले त्यानंतर मी दोन्ही पंचांचे समक्ष माझी लेखी स्वहस्ताक्षरात सादर केली. मी दिलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

दि.20/01/2025
प्रति,
मा.पोलीस उपअधिकक्षक साहेब,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वर्धा

विशय - एक लोकसेवक लाच मागणी करीत असल्याबाबत
अर्जदार - श्री. देवेंद्र गंगाधर महाकाळकर, वय 60 वर्ष, व्यवसाय- शेती/दवाखाना (डॉक्टर)रा. जयस्वाल कॉलनी, वार्ड नं. 6, मेन रोड बुट्टीबोरी,त.जि.नागपुर, मो.क्र. 9960021715

महोदय,
सविनय अर्ज सादर करतो की, माझी वडीलोपार्जित शेती माझी आई श्रीमती मिराबाई गंगाधर महाकाळकर यांचे नावे मौजा डोरली, ता.सेलु, जि.वर्धा येथे असलेली शेत सव्हे क्र. 33 मधील एकुण 0.91 हे.आर. शेत जमीन NHI 353.1 सिंदी (रेल्वे) चे भुसंपादन प्रकरण शेतीच्या एकुण क्षेत्रा पैकी 0.09 हे.आर. हे NHI 353.1 करीता संपादित केली होती. NHI 353.1 करीता संपादित केलेल्या शेतीत विहीरीचा उल्लेख केलेला नसल्यामुळे मला शासनाकडुन आर्थिक मोबदला मिळालेला नाही. याबाबत

मी दि. 05.09.2023 रोजी अर्ज केला होता परंतु माझे अर्जावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही न झाल्याने मी परत दि.12.12.24 रोजी मा.उपविभागीय अधिकारी (भुसंपादन वर्धा) तसेच भुमी अभिलेख कार्यालय,सेलु येथे माझे आर्थिक मोबदल्या संबंधाने लेखी अर्ज केला होता. दि.01.08.2023 रोजी मा.उपविभागीय अधिकारी (भुसंपादन वर्धा) यांनी उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय,सेलु यांना माझे शेत सव्हे क्र. 33 एकुण क्षेत्र 0.91 हे.आर. मधील भुसंपादित क्षेत्र 0.09 हे.आर. हे संपादीत केलेले क्षेत्र मल्टीमॉडेल लॉजेस्टीक पार्क सिंदी रेल्वे चे भुसंपादनात येत असुन सदर भुसंपादीत क्षेत्रात विहीर आहे किंवा नाही याबाबत अहवाल सादर करण्यास लेखी कळविले होते. परंतु त्यांनी आज पर्यंत कोणताही अहवाल सादर केलेला नव्हता.

दि. 06.01.2025 रोजी संध्याकाळी 08.47 वा. दरम्यान मी घरीच हजर असतांना श्री. नरेश जाधव, दुरूस्ती लिपिक, भुमि अभिलेख कार्यालय,सेलु यांनी त्यांच्या मोबाईल क्र. 9545778873 वरून दि. 08.01.2025 रोजी विहीरीचा पंचनामा करण्यासाठी येणार असल्याचे सांगितले व तुम्ही शेतात हजर रहा असे सांगितले. त्यानंतर दि. 08.01.2025 रोजी दुरूस्ती लिपिक श्री. नरेश जाधव यांनी माझे शेतातील विहीरीचे मोजमाप करून फोटो काढले. त्यावेळी तेथे NHI चे प्रकल्प अभियंता, श्री. प्रशांत थोरात हजर होते. विहीरीचे मोजमाप करून फोटो काढल्यानंतर दुपारी 03.00 वा. दरम्यान मी व दुरूस्ती लिपिक श्री. नरेश जाधव असे आम्ही दोघेही सेलडोह येथील चहा टपरीचे समोर गाडी उभी करून चहा घेवुन झाल्यानंतर चहा टपरीचे विरूध्द दिशेला गेलो असता श्री. जाधव यांनी मला विहीरीचा मोजणी अहवाल उपविभागीय अधिकारी तथा नझुल अधिकारी, वर्धा यांना पाठविण्यासाठी मला 6,000/-रू. ची मागणी केली आहे. मला त्यांना लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नाही. तसेच त्यांचेत व माझ्यात यापुर्वी कुठलिही आर्थिक देवाण-घेवाण नाही.

माझी वडीलोपार्जित शेती ही माझी आई श्रीमती मिराबाई महाकाळकर हिचे नावे असुन तिचे वय 82 वर्ष असल्याने तिचे शेतीचे सर्व व्यवहार मीच पाहतो. त्याबाबत तिने मला लेखी अधिकार पत्र दिलेले आहे. करीता मी माझे आईचे वतीने लेखी तक्रार देत आहे. कार्यवाही व्हावी ही नम्र विनंती.

यामप्रमाणे माझी लेखी तक्रार असुन मी माझी तक्रार दिले वरून श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम यांनी दोन्ही पंचा समक्ष मला तक्रारीचे कारण विचारले असता मी त्यांना व दोन्ही पंचाना थोडक्यात हकिकत माझी वरील लेखी तक्रार प्रमाणे सांगीतली. यांनतर श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम यांनी माझी लेखी तक्रार वाचुन शहानिषा करणेकामी दोन्ही पंचांना दिली असता दोन्ही पंचानी लेखी तक्रार वाचुन व मला विचारपुस करुन मी सांगीतले नुसार लेखी तक्रारीत नमुद असलेबाबत जाहीर करुन सदरचे लेखी तक्रारीवर स्वाक्षरी केली व त्यानंतर श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम यांनी सुध्दा माझे लेखी तक्रारीवर स्वाक्षरी केली.

दिनांक 20/01/2025 रोजी श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम यांनी मला व दोन्ही पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व मेमरी कार्ड संबधाने माहीती देवुन लेखी तक्रारीत नमुदप्रमाणे गै.अ. नरेश जाधव, दुरुस्ती लिपीक, भुमि अभिलेख कार्यालय सेलु यांनी मला माझे आईचे नावे असलेली शेत जमीनीतील विहीरीचे जागेचा मोबदला मिळण्याकरीता उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयातुन पंचनामा करून त्यांचा अहवाल मा.उपविभागीय अधिकारी,वर्धा यांना पाठविण्यासाठी गै.अ. यांनी 6,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी आहे का? याबाबत पडताळणी करीता गै.अ. नरेश जाधव यांची भेट घेण्याकरीता माझेजवळ नविन मेमरी कार्ड टाकलेले व्हॉईस रेकॉर्डर देवुन माझे व नमुद

गैरअर्जदार यांचेमधील भेटीदरम्यान होणारे संभाशण व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगुन श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम यांचे सुचनेवरुन सापळा पार्टीतील सदस्य यांनी मला तसेच दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चे गुणधर्माबाबत व नविन मेमरी कार्ड बाबत माहीती दिली.

तसेच श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम मला सापळा कार्यवाही कामी वापरण्यात येत असलेली लाच रक्कम हजर करण्याबाबत सांगीतले वरुन मी लाच रक्कम 6000/- ज्यात 500 रुपये दराच्या 12 चलनी नोटा श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम यांचे कडे पंचांचे समक्ष हजर केल्या. सदर नोटांना अॅन्थ्रॉसीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे सुचनेवरुन सापळा पार्टीतील सदस्य यांनी मला तसेच दोन्ही पंचाना अॅन्थ्रॉसीन पावडरचे गुणधर्माबाबत माहीती देवुन प्रात्यक्षीक देवुन नोटांवर पावडर लावण्यात आले.

त्यांनतर दिनाक 20/01/2025 रोजी गै.अ.नरेश जाधव यांची भुमि अभिलेख कार्यालय सेलु येथे जावुन लाच मागणी पडताळणीची शहानिशा करण्याचे सर्वानुमते ठरले.

यानंतर दिनांक 20/01/2025 रोजी श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम यांचे सुचनेवरुन सापळा पार्टीतील सदस्य यांनी मला पुन्हा एकदा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व मेमरी कार्ड संबधाने माहीती देवुन लेखी तक्रारीत नमुदप्रमाणे गै.अ. नरेश जाधव, दुरुस्ती लिपीक, भुमि अभिलेख कार्यालय सेलु यांनी मला माझे आईचे नावे असलेली शेत जमीनीतील विहीरीचे जागेचा मोबदला मिळण्याकरीता उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयातुन पंचनामा करून त्यांचा अहवाल मा.उपविभागीय अधिकारी,वर्धा यांना पाठविण्यासाठी गै.अ. यांनी 6,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी आहे किंवा नाही ? याबाबत पडताळणी करीता गै.अ जाधव यांची भेट घेण्याकरीता माझेजवळ नविन मेमरी कार्ड टाकलेले व्हॉईस रेकॉर्डर देवुन माझे व नमुद गैरअर्जदार यांचेमधील भेटीदरम्यान होणारे संभाशण व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगुन श्रीमती वैषाली वैरागडे मॅडमे यांचे सुचनेवरुन सापळा पार्टीतील सदस्य यांनी मला तसेच दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चे गुणधर्माबाबत व नविन मेमरी कार्ड बाबत माहीती देवुन सुस्थीतीत सुरु करुन माझे जवळ नविन मेमरी कार्ड टाकलेले व्हॉईस रेकॉर्डर वेळ 12.17 वा सुरु करुन गै.अ. यांचे भेटीस पंच क्र. 1 सह भुमि अभिलेख कार्यालय सेलु येथील गै.अ. यांचे कार्यालयात पाठवुन आमचेतील संभाशण व्हॉईस रेकॉर्डर व्दारे मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड करण्यात आले. गै.अ. जाधव यांची भेट घेवुन परत आल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर 12.48 वा बंद करण्यात आले. त्यानंतर भेटीदरम्यान गै.अ.जाधव यांनी गै.अ. नरेश जाधव, दुरुस्ती लिपीक, भुमि अभिलेख कार्यालय सेलु यांनी मला माझे आईचे नावे असलेली शेत जमीनीतील विहीरीचे जागेचा मोबदला मिळण्याकरीता उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयातुन पंचनामा करून त्यांचा अहवाल मा.उपविभागीय अधिकारी,वर्धा यांना पाठविण्यासाठी गै.अ. यांनी 6,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडी अंती माझेकडुन 5,000/- लाच रक्कम स्विकारण्याची पंच क्र. 1 यांचे समक्ष तयारी दर्षविली. त्याबाबत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मेमरी कार्डमध्ये रेकॉर्ड करण्यात आलेले आहे.

गै.अ. जाधव यांनी मला माझे आईचे नावे असलेली शेत जमीनीतील विहीरीचे जागेचा मोबदला मिळण्याकरीता उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयातुन पंचनामा करून त्यांचा अहवाल मा.उपविभागीय अधिकारी, वर्धा यांना पाठविण्यासाठी गै.अ. यांनी 6,000/- रुपये लाच रक्कमेची

मागणी करुन  तडजोडी अंती माझेकडुन 5,000/- लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली होती. त्यानंतर श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम यांनी पुढील सापळा कार्यवाही करण्याचा दोन्ही पंचांचे समक्ष निर्णय घेतला होता.

त्यावरुन दिनांक 20/01/2025 रोजी श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम यांनी पंचा समक्ष सापळा कार्यवाही समजावुन सांगत असतांना माझ्याकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रु. 6,000/- ज्यात 500/-रु. दराच्या भारतीय चलनाच्या 12 नोटा घेतल्या होत्या. त्यापैकी तडजोडी अंती मागणी प्रमाणे माझेकडे 5000/- रुपये लाच रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या 10 अँन्थ्राँसीन पावडर लावलेल्या चलणी नोटा सापळा अधिकारी पोलीस श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम यांनी आम्हास योग्य त्या सुचना देवुन तसेच वरील नमुद पावडर लावलेल्या 500/-रु. दराच्या 10 नोटा तसेच नविन मेमरी कार्ड टाकलेले व्हॉईस रेकॉर्डर वेळ 13 .10 वा. सुरु करून माझ्याजवळ गळयात अडकावुन देवुन श्रीमती वैषाली वैरागडे मॅडम व सापळा पथक तसेच दोन्ही पंच थांबुन असलेल्या सेलु जवळील कोटंबा फाटा येथुन मी व पंच क्र. 1 असे माझे जवळील मोपेड गाडी क्र. एम.एच. 40 ए.डी. 2907 होन्डा एँक्टीवा ने गै.अ. नरेश जाधव यांना भेटण्याकरीता भुमि अभिलेख कार्यालय सेलु येथे रवाना झालो व आमचे पाठोपाठ सापळा अधिकारी श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम  या त्यांचे स्टाफ व पंच क्रमांक 2 सह शासकीय वाहणाने आले. मी व पंच क्र. 1 असे भुमि अभिलेख कार्यालय सेलु पोहचल्या नतर आमचे काही अंतरावर सापळा अधिकारी श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम यांनी त्यांचे वाहन थांबवून सापळा पथकातील सहकारी कर्मचारी व पंच क्र. 2 चे सह सापळा लावला. यानंतर माझे व गै.अ. जाधव यांचे भुमि अभिलेख कार्यालय सेलु चे आत जावुन त्यांचे लाच रक्कम मागणी प्रमाणे गै.अ. जावध यांनी सांगीतल्या प्रमाणे माझे शर्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिष्यातुन माझे उजव्या हाताने काढुन देवुन गै.अ. यांनी त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे टेबल समोरील एका खाकी रंगाच्या बुकच्या आत मध्ये ठेवुन दिली. त्यानंतर गै.अ. जाधव यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर मला सापळा अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी लाच रक्कम स्विकारलेबाबत नियोजीत ईशारा करताच सापळा अधिकारी श्रीमती वैशाली वैरागडे मॅडम या  त्यांचे सोबतचे सापळा पार्टीतील सदस्यांसह माझे जवळ येवुन वेळ 13.26 वा त्यांनी व्हॉईस रेकॉर्डर बंद करून त्यांनी गै.अ. नरेश जाधव, दुरुस्ती लिपीक, भुमि अभिलेख कार्यालय सेलु जिल्हा वर्धा यांना ओळख देवुन व त्यांचे जवळ येण्याचे कारण सांगुण गै.अ. नरेश जाधव यांना सापळा पार्टीतील सदस्यांचे मदतीने ताब्यात घेतले त्यांचे कडुन 5000/- रुपये लाच रक्कम ताब्यात घेतली.

तरी आरोपी लोकसेवक श्री. नरेश चंद्रकांत जाधव, वय 48 वर्ष, पद - दुरूस्ती लिपीक, भुमी अभिलेख, महसुल विभाग, वर्ग - 3, रा. प्लॉट नं.41, ड्रिम लँड सिटी,सावंगी मेघे, वर्धा यांनी मला माझे आईचे नावे असलेली शेत जमीनीतील विहीरीचे जागेचा मोबदला मिळण्याकरीता उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयातुन पंचनामा करून त्यांचा अहवाल मा.उपविभागीय अधिकारी,वर्धा यांना पाठविण्यासाठी गै.अ. यांनी 6,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन  तडजोडी अंती माझेकडुन 5,000/- लाच रक्कम  त्यांचे भुमि अभिलेख कार्यालय येथे पंचासमक्ष स्विकारुन भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अंतर्गत गुन्हा केल्याने माझी त्याचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद संगणकावर टंकलीखीत करून व त्याची प्रिंट काढुन ती मला वाचण्यास दिली. ती मी वाचुन पाहीली माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.  सही sd इंग्रजित अस्पष्ट.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** DEVENDRA MATAPHERSINGH THAKUR (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** DEVENDRA MATAPHERSINGH THAKUR

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1977 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ य सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**